# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.12.2025** **वार- सोमवार**

---

**<u>ॲडमिरलदिनेशत्रिपाठी</u>**

२०४७मध्ये विकसित भारत प्रत्यक्षात आणण्यासाठी तरुणाईचे कौशल्यपूर्ण परिश्रम आवश्यक आहेत,असं मत नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी व्यक्त आज पुण्यात व्यक्त केलं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभागातर्फे जनरल बी. सी. जोशी स्मृति व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा पराग काळकर यावेळी उपस्थित होते. देशाच्या सागरी शक्तीचं महत्व सामान्य नागरिकांना समजेल त्यावेळी सागरी सामर्थ्य अधिक प्रभावशाली होईल, असं ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यावेळी म्हणाले. युद्धनौका बांधणीच्या क्षेत्रात देश  स्वावलंबी होणं महत्त्वाचं असून या माध्यमातून नवीन रोजगार निर्मितीही होणार असल्याचं ते म्हणाले.

**<u>माउलीसमाधी</u>**

राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिरामध्ये जाऊन समाधीचं दर्शन घेतलं. यावेळी माउलींच्या समाधीवर पंचोपचार पूजा आणि आरती केली. यावेळी आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजनाथ, यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थिती होते.

**<u>प्रचारसमाप्ती</u>**

नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठीच्या जाहीर प्रचाराची समाप्ती आज रात्री 10 वाजता होणार असून, त्यानंतर प्रचाराच्या कुठल्याच जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येणार नाहीत. यामुळं मतदानाच्या दिवशी म्हणजे उद्या मुद्रित माध्यमांतदेखील जाहिराती प्रसिद्ध करू नका, असं राज्य निवडणूक आयोगानं प्रसिद्धी पत्रकाद्वारे स्पष्ट केलं आहे.

**निवडणूक**

पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीवर ११ दिवसांत ७ हजार ६शे २४ हरकती आल्या आहेत. यात सर्वाधिक म्हणजे ३ हजार ४शे १९ हरकती सिंहगड रस्ता क्षेत्रीय कार्यालयाकडे आल्या आहेत. या निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आणि मतदान केंद्रनिहाय मतदार यादी जाहीर करण्यात आली. यात मतदारांची संख्या ३५ लाख ५१ हजार आहे. महापालिकेच्या ४१ पैकी १० प्रभागांमध्ये एक लाखापेक्षा जास्त मतदार आहेत.

**म्हाडापुणेमंडळ**

म्हाडा पुणे मंडळाच्या २० टक्के सर्वसमावेशक योजनेसह १५ टक्के एकात्मिक योजनेतील ४ हजार १शे ८६ घरांच्या सोडतीसाठी आतापर्यंत अनामत रक्कमेसह दोन लाखांहून अधिक अर्ज सादर झाले आहेत. या घरांसाठी २ लाख ४७ हजार ९८ जणांनी अर्ज भरला आहे. एका घरामागे ४० हून अधिक अर्ज दाखल झाले असून हा प्रतिसाद चांगला असल्याचं पुणे म्हाडा मंडळानं स्पष्ट केलं आहे. दुसऱ्या मुदतवाढीमुळं ११ डिसेंबरची सोडत आता कधी होणार हे अद्याप मंडळाकडून जाहीर करण्यात आलेलं नाही.

**पुरस्कार**

आर्य संगीत प्रसारक मंडळाच्या वतीनं देण्यात येणारा ‘वत्सलाबाई जोशी पुरस्कार’ पुण्याच्या माऊली टाकळकर यांना जाहीर करण्यात आला आहे. मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीनिवास जोशी यांनी ही माहिती

दिली. ५१ हजार रुपये आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. येत्या १० ते १४ डिसेंबर दरम्यान होणा-या ७१व्या सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवात हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

**२८वंराष्ट्रीयअधिवेशन**

ज्ञान, ग्रंथालय आणि माहिती नेटवर्किंगवरील २८व्या राष्ट्रीय अधिवेशनाचं म्हणजेचं नॅक्लिन २०२५चं आयोजन येत्या ३ ते ५ डिसेंबरला पुण्यात होणार आहे. या अधिवेशनासाठी देशभरातून २५० पेक्षा जास्त ग्रंथपाल आणि ग्रंथालय तज्ञ सहभागी होणार आहेत. ग्रंथालयातील कृत्रिम बुद्धिमता, तांत्रिक प्रगती, सार्वजनिक ग्रंथालयांची पुनर्रचना, डिजिटल युगातील वाचन संस्कृती, सायबर सुरक्षा आदी विषयांवर या परिषदेत तज्ज्ञांची व्याख्यानं आणि परिसंवाद होणार आहे.

**एमआयटी**

उद्याचं जग केवळ एआयच्या तंत्रावर नव्हे, तर ज्ञानोबा-तुकोबांच्या मंत्रावरही चालेल, असे विचार ज्येष्ठ लेखक आणि ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष विश्वास पाटील यांनी पुण्यात व्यक्त केलं. एमआयटी विश्वशांती विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आलेल्या तिसाव्या तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेच्या समारोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते काल बोलत होते. शिवाजी महाराजांना जिजाऊंनी विश्वशांतीची प्रेरणा दिली. त्यांच्यावर संतांच्या विचारांचा प्रभाव होता. शिवाजी महाराजांनी शक्ती, युक्ती आणि भक्तीच्या संगमातूनच स्वराज्य निर्माण केलं, असं पाटील म्हणाले.

**दंड**

पुणे महापालिकेची परवानगी न घेता बेकायदा झाड तोडणाऱ्याला १ लाख रुपयांपर्यंत दंड केला जात आहे. झाडं तोडण्याबाबतच्या १९६४च्या कायद्यात सुधारणा करणारी ही तरतूद लागू करण्यात आली आहे; त्यानुसार दंडाची रक्कम वाढवण्यात आली आहे.

**खेळ**

महाराष्ट्र चेस सर्कल मान्यतेनं खुल्या गटाच्या बुद्धिबळ स्पर्धा आज पार पडल्या. स्पर्धेत समर कोरे, सर्वज्ञ बालगुडे, अविरत चौहान, अर्णव कदम यांनी अनुक्रमे 7,10,15 आणि 20 वर्षाखालील गटात विजेतेपद पटकावलं. विजेत्यांना रोख पारितोषिक, सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्रे देण्यात आली. या स्पर्धेसाठी 80 शाळांमधून जवळपास पाचशे विद्यार्थी सहभागी झाले होते.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 10 अंश सेल्सियस नोंदवलं गेलं, उद्याही किमान तापमान 10 अंशांच्या आसपास राहण्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**